# निवडणुक प्रचार अभियान- दि.26.04.2014

**अरुण जेटली**
(विरोधी पक्षनेते, राज्यसभा)

काल, नरेंद्र मोदी यांनी पंजाब मध्ये पाच रॅलींना संबोधित केले. पंजाबचे मुख्यमंत्री सरदार प्रकाश सिंह बादल आणि राज्यातील भाजप अध्यक्ष कमल शर्मा यांच्या संयुक्त विद्यमाने या रॅली आयोजित केल्या होत्या. प्रत्येक रॅलीला जनतेची खुप मोठ्या प्रमाणावर गर्दी होती. झालेल्या मोठ्या गर्दी दरम्यान जनतेचा उत्साह अभुतपूर्व होता. मोदी यांची पंजाबला भेट म्हणजे गेमचेंजर असल्याचे बोलले जात आहे.

महत्त्वाची गोष्ट अशी की मोदी यांचे निवेदन हे युवकांना उद्देशून होते हे खुप स्पष्टपणे दिसले. युवकांना उत्तेजीत करण्याची त्यांची क्षमता आणि युवा पिढीला प्रोत्साहन देणे हे खुप स्पष्ट आहे. कुशासनाबरोबरच संभ्रमाच्या वातावरणात ते आशेचा किरण बनले आहेत असे वाटत आहे.

जे रॅलीला उपस्थित नव्हते ते रॅलींच्या राजकीय परिणामाच्या विश्लेषण करताना पाहायला मिळतात. अमृतलरमध्ये मोदी यांच्या भेटी दरम्यान जनतेते खुप उत्साह दिसून आला. त्यांनी दिलेल्या वचनांचे पालन करण्यास ते सक्षम आहेत असा विश्वास त्यांनी जनतेमध्ये उभा केला. याच कारणामुळे राजकारणी त्यांचे उदाहरण देताना दिसत आहेत.

**जनरल व्ही.के.सिंग अमृतसरमध्ये**

आज, माझ्या निवडणुक प्रचारासाठी कार्यक्रमांची श्रेणीबद्ध शृंखला आखण्यात आली. त्यापैकी एक महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे सैन्यातील माजी सैनिकांसाठी जनरल व्ही.के.सिंह यांच्याद्वारे करण्यात आलेले संबोधन. माजी सैनिक मोठ्या संख्येन एकत्र झाले होते. सशस्त्र दलाचे निवृत्त अधिकारी मोठ्या संख्येने या कार्यक्रमासाठी आधीच सक्रीय झाले आहेत. माजी सैनिकांना 'एक रँक एक पेंशन' चे वचन देण्यात आले असून त्याची अंमलबजावणी न झाल्याच्या कारणास्तव ते नाराज आहेत. युपिएच्या दुबळ्या नितीने त्यांच्या मनावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. बदलत जाणा-या भौगोलिक वास्तविकतेमध्ये भविष्यात कोणत्याही आक्रमणावेळी पाकिस्तान आणि चीन एकसाथ पाहायला मिळतील अशी स्थिती आहे. अशावेळी परिस्थितीचे विश्लेषण करण्याची गरज आहे. आपल्या सैन्याचे संरक्षण खरेदी कार्यक्रम आणि सुसज्जतेबाबत गंभीर परिणाम सहन करावे लागणार आहेत. ए.के.एंटनी यांच्या मंत्रीपदामुळे संरक्षण मंत्रालय भरकटले आहे.